॥ श्रीगुरु:शरणम् ॥

## श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य
## श्रीविद्यारण्यस्वामीविरचित

# सद्गुरुप्रार्थना

~~:०:~~

**१ हिरण्यगर्भादि–स्थावरान्तेषु शरीरेषु यद् एकं चैतन्यं अस्ति तदेव अहमस्मि, इति दृढज्ञानसिद्धिः भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१ महाराज ! हिरण्यगर्भापासून अगदी स्थावरापर्यंत सर्व शरीरांच्या आत जे एक चैतन्यस्वरूप आहे, तेच मी अशा प्रकारचे दृढ ज्ञान मला प्राप्त होईल, असा मजवर आपण अनुग्रह करा !

**२ लय-विक्षेप-कषाय-रसास्वादेभ्यः रक्षितं चित्तं अविघ्नेन ब्रह्मणि अवस्थितं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२ लय, विक्षेप, कषाय आणि रसास्वाद इतक्यांपासून माझ्या चित्ताचे संरक्षण होऊन ते निर्विघ्नपणे परब्रह्माच्या ठिकाणी स्थित होईल, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३ नित्य–निर्विकार–असंग–अद्वितीय–परिपूर्ण–सच्चिदानंद-स्वप्रकाश-ब्रह्मानुभवसिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३ नित्य, निर्विकार, असंग, अद्वितीय, परिपूर्ण, सच्चिदानंदस्वरूप व स्वयंप्रकाश अशा ब्रह्माचा मला साक्षात्कार व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४ अहमादि–दृश्य – विलक्षण – अस्मत्प्रत्ययानुभूतप्रत्यक् चिन्मात्र–अनुभव–सिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४ अहंकारादि दृश्य तत्त्वांहून वेगळा, पण 'मी' या अनुभवाने प्रत्ययास येणारा आणि अंतर्यामी अशा चिन्मात्रस्वरूपाचा मला साक्षात्कार व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**५ सजातीय–विजातीय–स्वगत–भेदरहित–अखंड-सच्चिदानंद – अद्वितीय – ब्रह्मानुभवसिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

५ सजातीय, विजातीय व स्वगत या भेदत्रयाने विरहित आणि अखंड सच्चिदानंदस्वरूप व अद्वितीय अशा परब्रह्माचा मला साक्षात्कार व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**६ नित्य-शुद्ध-मुक्त-बुद्ध–सत्य–परानन्द–अद्वितीय–ब्रह्मात्मानुभवसिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

६ नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सत्य आणि परमानंदस्वरूप अशा अद्वितीय परब्रह्माचा मला साक्षात्कार व्हावा, असा महाराज! मजवर आपण अनुग्रह करा!

**७ स्वगतादि-भेदरहित-सच्चिदानंद-लक्षण-ब्रह्माभिन्न-कूटस्थ-प्रत्यक्स्वरूप - सर्वसाक्षी इति चिद्रूपानुभवसिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

७ स्वगतादि भेदांनी रहित आणि सच्चिदानंदस्वरूप अशा परब्रह्माहून अंतर्यामी गूढस्वरूपाने राहणारे सर्वसाक्षी चैतन्य माझ्याहून अगदी भिन्न नाही, असा मला अनुभव यावा, असा महाराज! मजवर आपण अनुग्रह करा!

**८ स्वात्मनः अन्यत्वेन प्रतिभातं सकलं साक्ष्यं जगत् स्व-अविद्या-विलसितत्वेन स्व-अनन्यत्वात् स्वात्ममात्र-अद्वितीय-ब्रह्मानुभवसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

८ स्वतःहून वेगळे दिसून येणारे हे सर्व दृश्य जगत् केवळ स्वतःचाच अविद्यात्मक विलास असल्यामुळे स्वतःहून भिन्न नाही, तर स्वात्ममात्र अद्वितीय ब्रह्मच आहे, असा प्रत्यय मला प्राप्त होईल, असा महाराज! मजवर आपण अनुग्रह करा!

**९ असंभावना-विपरीतभावना-रहितत्वेन करतलामलकवत् अहं-ब्रह्मास्मि इति अप्रतिबद्ध अपरोक्ष-ब्रह्मसाक्षात्कारः दृढो भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

९ असंभावना, विपरीत भावना वगैरे दूर होऊन अगदी तळहातावरच्या आवळ्याप्रमाणे 'मीच ब्रह्म' असा परब्रह्माचा साक्षात् अनुभव अगदी निष्प्रतिबंधपणे व दृढपणे मला यावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१० यः ब्रह्मादिस्तंबपर्यन्तानां सर्वेषां प्राणिनां देहमध्ये तत्तत्साक्षित्वेन भासमानः परिपूर्णात्मा अस्ति सः अयं परमात्मा केवलं मुमुक्षोः पुरुषस्य मे स्वरूपं इत्येवंरूपः आत्मसाक्षात्कारः भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१० जो थेट ब्रह्मदेवापासून एखाद्या गवताच्या काडीपर्यंत सर्व प्राण्यांच्या शरीरांमध्ये त्या त्या शरीराचा साक्षी म्हणून आढळून येणारा परिपूर्ण आत्मा, तोच परमात्मा होय व केवळ मोक्षाची इच्छा करणाऱ्या माझे तेच स्वरूप होय, या प्रकारचा आत्मसाक्षात्कार मला व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**११ वासनाक्षय– मनोनाश – तत्त्वज्ञान – अभ्यासवशात् १ ज्ञानरक्षा, २ तपःसिद्धिः, ३ सर्वसमत्वं, ४ दुःखनिवृत्तिः ५ सुखाविर्भावः इत्येतत्–पंचप्रयोजन–सिद्धिर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !!**

११ वासनाक्षय, मनोनाश आणि तत्त्वज्ञान या तिहींच्या अभ्यासाच्या योगे १ निर्बाध आत्मज्ञान, २ तपश्चर्येची पूर्णता, ३ सर्व ठिकाणी समबुद्धी, ४ दुःखाचा नाश आणि ५ सुखाचा स्पष्ट अनुभव या पाच गोष्टी मला सिद्ध व्हाव्यात, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१२ मैत्री–करुणा–मुदिता–उपेक्षा इति सद्वासनापाटवेन रागादि–दुर्वासनाक्षयः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१२ मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा या सद्वासनांचा विकास होऊन त्यायोगे आसक्ती, लोभ वगैरे सर्व दुर्वासनांचा पूर्णपणे क्षय व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१३ निरंतर–स्वात्मानुसंधान–वशात् मनसः वृत्तिरूप–परिणामपरित्यागेन निरुद्धताकारेण परिणामः दृढो भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१३ निरंतर आत्मानुसंधान चालल्यामुळे, मनावर ज्या नाना वृत्ती उद्‌भूत व्हावयाच्या त्या न होता, ते निरुद्ध व एकाग्र होऊन राहवे, अशी दृढता होण्याचा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१४ शमादिपूर्वकं श्रवण–मनन–निदिध्यास–अभ्यास–बलात् १ विषयासक्तिः, २ प्रज्ञामांद्यं, ३ कुतर्कः, ४ विपर्ययदुराग्रहश्च इति वर्तमान–प्रतिबंध–चतुष्टयनिवृत्तिद्वारा अप्रतिबद्ध–अपरोक्ष–ब्रह्मसाक्षात्कारः भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१४ शमदमादि साधनांचे अनुष्ठान आणि श्रवण, मनन व निदिध्यास यांच्या दृढाभ्यासामुळे, १ विषयांची आसक्ती, २ बुद्धीचा मंदपणा, ३ कुतर्क आणि ४ विपरीत भावनेचा दुराग्रह हे सध्याचे माझे चार प्रकारचे प्रतिबंध नष्ट होऊन

परब्रह्मस्वरूपाचा पूर्ण निर्बाध असा प्रत्यक्ष साक्षात्कार मला व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१५ उपक्रमादि-षड्विध-लिंगैः अशेष-वेदान्तानां अद्वैते ब्रह्मणि तात्पर्यावधारणं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१५ उपक्रमोपसंहारांची एकरूपता, अभ्यास, अपूर्वता, फल व अर्थवाद या सहा लिंगांच्या आधाराने पाहता सर्व वेदान्तग्रंथांचे तात्पर्य अद्वैत ब्रह्मतत्त्व हेच आहे, असा माझा निश्चय व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१६ गुरुमुखात् श्रुतस्य अद्वितीय-वस्तुनः वेदान्तानुगुण-युक्तिभिः अनवरतं अनुचिन्तनं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१६ प्रथम गुरुमुखाने श्रवण होऊन, नंतर वेदान्त-शास्त्रात सांगितलेल्या युक्तिसिद्ध विचाराच्या योगे त्या अद्वैत-परब्रह्माचे अखंड चिंतन मजकडून व्हावे, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१७ विजातीय - देहादिप्रत्यय - अनंतरित -सजातीय-सच्चिदानंद-आत्मप्रत्ययप्रवाहः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१७ माझा सच्चिदानंद आत्मस्वरूपाचा अनुभव प्रवाहा-प्रमाणे सतत चालू राहून, त्यात देहादि अन्य पदार्थांचे भान न यावे, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१८ असंगोहं चिदात्माहं इति प्रत्यगात्मनि निवेशिते वृत्तिरहिते संस्कार-शेषमात्रतया सूक्ष्मरूपेण अवस्थिते चित्ते आत्मनः स्वरूपभूतः परमानन्दः निरंतरं सम्यक् आविर्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१८ मी असंग आहे, मी चैतन्यस्वरूप आहे, अशा प्रकारे प्रत्यगात्म्याच्या ठिकाणी लीन झालेले चित्त वृत्तिशून्य परंतु बीजभूत संस्कारांच्या योगे सूक्ष्म रूपाने स्थित असता त्याच्या ठिकाणी स्वरूपभूत परम आनंद निरंतर प्रगट होत राहावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**१९ अहं आत्मा साक्षी केवलचिन्मात्रस्वरूपः, न अज्ञानं तत्कार्यं च-किंतु नित्य-शुद्ध बुद्ध-मुक्त-सत्य-परमानंद-अद्वय-ब्रह्मैव-अहमस्मि इति अभेदेन अवस्थानं समाधिः अन्तःसमाधिना दृग्दृश्यविवेके बहिःसमाधिना ब्रह्मसर्गविवेके च दृढे जाते, तेन विवेकद्वयेन अयं गलितदेहाभिमानः विज्ञात परमात्मतत्त्वश्च भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

१९ मी आत्मा, सर्वांचा साक्षी व केवल चिन्मात्रस्वरूप असून माझ्या ठिकाणी अज्ञान व त्याचे कार्य जो संसार तो काही एक नाही; तर मी केवळ नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सत्य आणि परम आनंदस्वरूप अद्वितीय परब्रह्मच आहे, अशा प्रकारे जी अभेदस्थिती मनास येते, तिचे नाव समाधी. त्यामध्ये अंतःसमाधीने द्रष्टा व दृश्य यांचा विचार आणि बहिःसमाधीने ब्रह्म व जग यांचा विचार दृढ होतो. तर अशा दोन्ही प्रकारच्या विवेकांच्या योगे माझा देहाभिमान

गळून जाऊन मला परमात्मतत्त्वाचे पूर्ण विज्ञान व्हावे, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

२० देहाद्बहिः सकल-नामरूपात्मकेषु वस्तुषु सर्पधारा-दिषु रज्जुरिव व्याप्तः सच्चिदानन्दलक्षणः यः परमात्मा स एव पर-शब्देन उच्यते, अंतः अहमादिदृश्यविलक्षणः अस्म-त्प्रत्यय-आलंबनभूतः प्रत्यक्चिन्मात्रस्वरूपः साक्ष्याख्यः जीवात्मा स एव अवरशब्देन उच्यते; परश्च असौ अवरश्च इति परावरः प्रत्यगभिन्नः परमात्मा, तस्मिन्नेवं अंतर्बहिः पररूपेण अवररूपेण च अवस्थिते परमार्थतः परावरे ब्रह्मणि 'त्वं वा अहं अस्मि भगवो देवते वा अहं वा त्वमसि' इति श्रुत्यनुसारेण अहं ब्रह्मास्मि-ब्रह्मैवाहमस्मि इति व्यतिहारेण अखंड-एकरसत्वेन साक्षात्कृते सति तेन परावर-ब्रह्मसाक्षा-त्कारेण परावर-ब्रह्म साक्षात् कृतवतः तव हृद्ग्रंथिभेदः सर्वसंशयनिवृत्तिः सर्वकर्मक्षयरूपः परमपुरुषार्थः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्त अनुगृह्णन्तु !

२० रज्जूवर भासमान झालेल्या सर्प, पाण्याची धार इ. प्रकारात सर्वत्र जशी रज्जू (दोरी) व्यापून असते, त्या-प्रमाणे जो सच्चिदानंदलक्षण परमात्मा शरीराच्या बाहेर जेवढ्या काही नामरूपात्मक वस्तू आहेत त्या सर्वांत व्यापून राहिला आहे, तो पर आणि शरीराच्या आत, अहंकारादि दृश्य तत्त्वांहून वेगळा, 'आपण' या अनुभवाला नित्य आश्रय असणारा, अंतश्चैतन्यस्वरूप व चित्तादिकांचा साक्षी असा जो जीवात्मा तो अवर, एवंच पर तोच अवर. तो

कूटस्थ परमात्मा पररूपाने बाहेर व अवररूपाने आत असा परमार्थदृष्टचा अंतर्बाह्य व्यापून आहे. " देवी भगवती ! तू ती मीच आहे व मी तो तूच आहेस," या श्रुतिवचनात सांगितल्याप्रमाणे 'मी ब्रह्म आहे' आणि 'ब्रह्म मीच आहे.' असा दोहींकडून निश्चय होऊन, अखंड एकरस असा त्या परावर ब्रह्माचा साक्षात्कार झाला असता त्याच्या योगे तो साक्षात्कार करून घेत असणाऱ्या मला हृदयग्रंथीचा भेद, सर्व संशयांचा नाश आणि सर्व कर्मांचा क्षय करणारा मोक्षनामक परम पुरुषार्थ सिद्ध होवो, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२१ अहंकार–आत्मनोः एकत्व–भ्रम–निवृत्ति–रूपः ग्रंथि-भेदः दृढीभूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२१ अहंकार तोच आत्मा अशा प्रकारचा भ्रम दूर होणे हाच हृदयग्रंथीचा भेद होय. तो पूर्ण होऊन दृढ व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२२ आत्मा देहद्वयातिरिक्तः न वा ? व्यतिरिक्तत्वेऽपि कर्तृत्वादि–धर्मयोगी न वा ? अकर्तृत्वेऽपि तस्य ब्रह्मणः अभेदः अस्ति न वा ? अभेदेऽपि तज्ज्ञानं कर्मादिसहितं मुक्तिसाधनं केवलं वा ? आत्मा साक्षी कर्ता वा ? साक्षि-त्वेऽपि अस्य ब्रह्मत्वं अस्ति न वा ? ब्रह्मत्वेऽपि तत् बुद्ध्या वेत्तुं शक्यते न वा ? शक्यत्वेपि तद्वेदनमात्रेण मुक्तिः अस्ति न वा ? मम परमार्थतः ब्रह्मत्वं न वा ? ब्रह्मत्वेऽपि मम तादृग्रूपं साक्षात्कृतं न वा ? साक्षात्कृतेऽपि इतःपरं कर्तव्यं अस्ति न वा ? जीवन्मुक्तित्वे अपि वर्तमान–देहपातानंत**

**भाविनी विदेहमुक्तिः भविष्यति न वा? तत्प्राप्तौ अपि कालान्तरेषु पुनर्जन्म भविष्यति न वा? इत्यादि सर्व-संशयनिवृत्तिः भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

२२ आत्मा स्थूल व सूक्ष्म देहांहून निराळा आहे किंवा तोच आहे? निराळा असला तरी कर्तृत्वादी धर्म त्याला लागतात किंवा नाही? लागत नसले तरी त्याचे ब्रह्माशी ऐक्य आहे किंवा नाही? ऐक्य असले तरी मोक्षाला साधन असे जे त्याचे ज्ञान, ते नुसतेच चालेल किंवा त्याच्या जोडीला कर्म हवे? नुसते चालत असले तरी–तरी पण आत्मा हा नुसता साक्षीच आहे किंवा कर्ता आहे? साक्षी असला तरी तो ब्रह्मरूप आहे किंवा नाही? ब्रह्मरूप असला तरी तो बुद्धीला जाणता येणारा आहे किंवा नाही? जाणता येणारा असला तरी नुसत्या जाणण्याच्या योगाने मोक्ष होईल किंवा नाही? तसेच परमार्थदृष्टया मी स्वतः ब्रह्मरूप आहे किंवा नाही? ब्रह्मरूप असलो तरी ते माझे रूप मला साक्षात् कळेल किंवा नाही? साक्षात्कार झाल्यावर तरी मग पुढे काही कर्तव्य आहे किंवा नाही? कर्तव्य नसले तरी त्याच वेळी मी जीवन्मुक्त आहे असे समजावयाचे की नाही? जीव-न्मुक्त असलो तरी प्रस्तुत शरीर गळून पडल्यानंतर पुढे मला विदेहमुक्ती होईल किंवा नाही? आणि विदेहमुक्ती होणार असली तरी पुन्हा कालांतराने मला जन्मास यावे लागेल की नाही? इत्यादि सर्व प्रकारच्या संशयांचा नाश व्हावा, असा महाराज! मजवर आपण अनुग्रह करा!

**२३ अनारब्धानां आगामि-जन्महेतूनां अनेक कोटिजन्मार्जितानां प्रारब्धातिरिक्तानां संचितकर्मणां निवृत्तिरूपः परम-पुरुषार्थः सम्यग्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२३ प्रस्तुत शरीरात जी प्रारब्धकर्मे मला आपले फळ देण्यास प्रवृत्त झालेली आहेत, त्यांशिवाय माझी जी कित्येक कोटी जन्मांपासून साठत आलेली पूर्व कर्मे, जी यापुढे जन्म होण्यास कारण होऊन बसली आहेत, त्या सर्वांचा क्षय होऊन मोक्षरूप परमपुरुषार्थ मला पूर्णपणे सिद्ध व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२४ यः पूर्ण आनंदैकबोधः तत् ब्रह्म अहं अस्मि इति ब्रह्मात्मानुभवमात्र-पर्यवसाने बुद्धिः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२४ जो पूर्ण आनंदस्वरूपबोध तेच ब्रह्म व ते तेच मी आहे, अशा प्रकारच्या ब्रह्मात्मानुभवाच्या अंतिम निर्णयावर माझी बुद्धी निरंतर स्थित होवो, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२५ यस्मिन् काले द्वैतभानं नास्ति, निद्रापि न आगच्छति तस्मिन् काले उपलभ्यमानं यत्सुखं अस्ति स ब्रह्मानंदः इति ब्रह्मानुभवसिद्धिः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२५ ज्या वेळी या जगाचे भान नसते आणि निद्राही आलेली नसते, त्या वेळी जे सुख प्रत्ययास येते तोच ब्रह्मानंद होय. तो ब्रह्मानुभव मला पूर्णपणे व निरंतर लाभावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२६ मनोव्यापार-अभावसमये यत्सुखं भासते तत्सुखं आत्मरूपं इति आत्मनिश्चयः सम्यक् भूयात्, इति भवन्त महान्तः अनुगृह्णन्तु !**

२६ चित्ताच्या ठिकाणी संकल्पविकल्पादि उद्भवत नाहीत अशा वेळी जे सुख प्रतीत होते तेच आत्म्याचे स्वरूप होय, अशा प्रकारे आत्मस्वरूपाचा माझा उत्कट निश्चय व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२७ स्वस्वप्नः स्वातिरिक्तेन यथा नास्ति, तथैव स्वजागृत् अपि स्वातिरेकेण नास्ति, तेन अद्वितीय आत्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२७ आपण अनुभविलेले स्वप्न जसे आपल्याहून वेगळे नसते, त्याप्रमाणे आपण अनुभवितो ही जागृती (जगत्) आपल्याहून वेगळी नाही. सारांश, एकमात्र अद्वितीय आत्मस्वरूप मात्र आहे, असा दृढ अनुभव मला यावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२८ वासनाक्षय–मनोनाशाभ्यां निर्वासने वृत्तिशून्ये चित्ते संशय–विपर्यय–दोषद्वयाभावेन प्रतिबंधाभावात् उत्पन्नं ज्ञानं अबाधेन सुरक्षितं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

२८ वासनाक्षय आणि मनोनाश या दोहोंच्या अभ्यासाच्या योगे चित्त निर्वासन आणि वृत्तिशून्य झाले असता संशय आणि विपर्यय या दोन्ही दोषांचा नाश होऊन, सर्व प्रतिबंध निरस्त झाल्यामुळे, प्रकट झालेले आत्मज्ञान निर्बाध व सुरक्षित राहावे, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**२९ पंचम्यादि-भूमित्रयस्वरूपायां जीवन्मुक्तौ संपाद्य-मानायां द्वैतभास अभावेन संशय-विपर्यय-प्रसंगाभावात् उत्पन्नं तत्त्वज्ञानं अबाधेन सुरक्षितं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

२९ पंचम, षष्ठ आणि सप्तम या तिन्ही भूमिकांच्या अवस्थांस पोहोचून जीवन्मुक्ती प्राप्त झाली असता सर्व द्वैत-भान संपून व संशय-विपर्ययांचे प्रसंग नष्ट होऊन, मला प्राप्त झालेले तत्त्वज्ञान निर्बाध व सुरक्षित राहो, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३० स्वप्ने स्थूलशरीराभाने, सुप्तौ लिंगशरीराभाने, समाधौ कारणाभाने च जागृदादि-अवस्था-चतुष्टये यः चिद्रूपात्मा मणिषु सूत्रं इव अनुस्यूततया निरंतरं भासते सः चिद्रूपात्मा एव अहं अस्मि, इति अन्वयव्यतिरेकाभ्यां शरीर-त्रयस्य व्यावृत्ति तत्साक्षिचैतन्यस्य अनुवृत्ति च पश्यतः मम शरीरत्रयव्यतिरिक्त-आत्मानुभवसिद्धिः भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३० स्वप्नामध्ये स्थूलशरीराचे भान नसताना, झोपेत लिंगशरीराचे भान नसताना आणि समाधीत कारणशरीराचे भान नसताना जाग्रदादि चारही अवस्थांमध्ये,-माळेच्या मण्यांमध्ये जसे एक सूत्र सर्वत्र अखंडित असते, त्याप्रमाणे जे चिद्रूप आत्मस्वरूप निरंतर प्रतीत होत असते, तोच मी, शरीरादि अन्य कोणीही मी नव्हे, याप्रमाणे अन्वयव्यतिरेकांनी तिन्ही शरीरांहून मी वेगळा आहे, त्यांना साक्षी असणारे

चैतन्य तेच मी आहे, अशा वृत्तीचा सतत अनुभव येऊन, मला शरीरत्रयव्यतिरिक्त असा आत्मानुभव सिद्ध व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३१ भगवन्तं परमेश्वरं प्रीतिपूर्वकं भजतः मम उपरि अनुकंपार्थं भगवान् वासुदेवः आत्मभावस्थः सन् विवेक-प्रत्ययरूपेण भक्तिप्रसाद-स्नेहाभिषिक्तेन मद्‌भावना-अभि-निवेश-वातेरितेन ब्रह्मचर्यादि-साधनसंस्कारवत्प्रज्ञा-वर्तिना विरक्त-अंतःकरण-आधारेण विषयव्यावृत्तचित्त-रागद्वेषा-कलुषित-निवात-अपावरकस्थेन नित्यप्रवृत्त - एकाग्रध्यान-जनित-सम्यक्‌दर्शन-भास्वता ज्ञानदीपेन अज्ञानजं अविवेकतः जातं मिथ्याप्रत्ययरूपं मोहान्धकारं तमः नाशयतु इति आशीः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३१ भगवान् श्रीपरमेश्वराची प्रेमपूर्वक उपासना करीत असल्यामुळे, मजबद्दल करुणा उत्पन्न होऊन भगवान् श्रीवासुदेव माझ्या हृदयात येऊन वसावा व त्याने विवेक-प्रत्ययरूप ज्ञानाचा दीप माझ्या हृदयात पेटवावा; त्या दीपाला माझ्या भक्तीमुळे झालेल्या ईश्वरी प्रसादाचे तेल असावे; माझ्या भक्तिभावाच्या तीव्रतेचा वायू त्यास पुरवला जावा; ब्रह्मचर्यादि साधनांच्या योगे जिच्यावर सुसंस्कार झाले आहेत अशी माझी बुद्धी ही त्याला वात व्हावी; वैराग्यपूर्ण अंतःकरण हे त्याला स्थळ असावे; विषयांपासून निवृत्त झालेले चित्त रागद्वेषांनी क्षुब्ध होण्याचा संभव नसल्यामुळे तो त्याला निर्वात असा कोनाडा व्हावा; दररोज चाललेल्या एकाग्र ध्यानाच्या योगाने तो दीप

सुंदर प्रकाशला जावा; व अशा प्रकारच्या त्या ज्ञानदीपाने, मिथ्या प्रत्यय देणाऱ्या व अज्ञान आणि अविवेक या द्वयीपासून उत्पन्न होणाऱ्या मोहरूप अंधकाराचा–तमाचा नाश व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३२ परमेश्वरं प्रीतिपूर्वकं भजन्तः ये भक्ताः येन बुद्धियोगेन सम्यग्दर्शनलक्षणेन आत्मभूतं परमेश्वरं आत्मत्वेन उपयांति–प्रतिपद्यन्ते, तं बुद्धियोगं भगवान् वासुदेवः ददातु इति आशीः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु!**

३२ परमेश्वराची प्रेमपूर्वक उपासना करणारे भक्तजन निश्चित अर्थात् ज्ञानरूप अशा ज्या बुद्धियोगाच्या साह्याने आत्मस्वरूप परमात्म्याच्या पदाला पावून तद्रूप होऊन जातात, तो बुद्धियोग भगवान् श्रीवासुदेवाने मला निरंतर द्यावा, अशा प्रकारचा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३३ विकारमंतरेण स्वाध्यस्तं सर्वं साक्षात् अव्यवधानेन स्वरूपबोधेन ईक्षते–पश्यति इति साक्ष्यनुभवः सम्यग्भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३३ आत्म्याला काही विकार झाला नसून फक्त अध्यासामुळे म्हणजे आरोपामुळे त्याच्यावर हे सर्व जगत् भासत आहे अशा प्रकारचा साक्षित्वाचा अनुभव अखंड स्वरूपबोधाच्या योगे मला पूर्ण प्राप्त व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३४ देहेंद्रियादि–सकल–जडाभासकत्वेन चिद्रूपः आत्मा इति चिदात्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३४ आत्मा हा देह, इंद्रियें इत्यादि सर्व जड पदार्थांना प्रकाशित करतो किंवा जाणतो, म्हणून तो ज्ञानस्वरूप आहे, चिद्रूप आहे. तर असा चैतन्यानुभव मला पूर्णपणे सिद्ध व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३५ आत्मनि कदाचित्–अप्रिय–अभावेन परप्रेमास्पदत्वेन च आत्मा परमानंदरूपः इति आनंदात्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३५ आत्मा हा (आपणा स्वतःला) केव्हाही नकोसा वाटणारा नसल्यामुळे किंबहुना आत्मा हाच सर्व प्रेमाचे मूळ स्थान असल्यामुळे तो परम आनंदरूप आहे हे उघड आहे. तर हा आनंदात्मानुभव मला बरोबर व्हावा, असा महाराज! मजवर आपण अनुग्रह करा !

**३६ असत्–जड–दुःखात्मक–अहंकारादिभ्यः विलक्षणतया प्रतिकूल्येन सत्यज्ञानानन्दरूपेण अञ्चति–प्रकाशते इति प्रत्यक् आत्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३६ मन, बुद्धी, अहंकार यांचे स्वरूप मिथ्या आहे, ते जड आहेत, दुःखात्मक आहेत; यांच्याहून वेगळा किंबहुना यांच्या अगदी उलट–सत्य, ज्ञान आणि आनंद या स्वरूपांनी जो अंतरी प्रतीत होतो तो प्रत्यगात्मा. तर त्याचा मला पूर्ण अनुभव व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३७ अभानरूपस्य विश्वस्य भानं भासकसंनिधेः विना कदाचित् भानाभावात् भानरूपात्मा सर्वगतः इति सर्वगत–**

**आत्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३७ विश्व हे स्वभावतःच जड असल्यामुळे त्याला प्रकाशित करण्यास प्रकाशक आत्म्याची आवश्यकता असते. म्हणून आत्मा हा भानरूप आहे असे म्हणतात. याप्रमाणे आत्मा सर्वगत आहे असा मला अनुभव यावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**३८ पश्चात् भासमानस्य जडस्य प्रथमतः भासमानं चैतन्यं एव वास्तवस्वरूपं इति निश्चित्य जडं उपेक्ष्य चिन्मात्रमेव चित्तं निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३८ (जड पदार्थ प्रतीत होण्यास जाणीव हे कारण आहे. त्यामुळे प्रथमतः जाणीव व नंतर जड पदार्थ ज्ञात होतो. तेव्हा) मागाहून प्रत्ययास येणाऱ्या जड पदार्थाचे आरंभी प्रतीत होणारे जे ज्ञान-जाणीव-तेच वास्तविक स्वरूप आहे असा निश्चय करून, माझे चित्त जडापासून परतून केवळ चिद्रूप होऊन राहावे, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

३९ **‘सर्वाण्येव एतानि प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति’ इति वाक्येन देहेंद्रियादि-साक्षिरूपं यत्प्रज्ञानं त्वंपदार्थरूपं निर्णीतं, तदेव ‘एष ब्रह्म’ इत्यादिवाक्येन जगत्कारणतया निर्णीतं परं ब्रह्म, न च अनयोः ईषदपि भेदः अस्ति इति ऐतरेयमहावाक्यज्ञानसिद्धिः निरंतरं भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

३९ " ही सर्व त्या एका चैतन्याचीच नावे आहेत. " या श्रुतिवाक्याच्या योगे, देहेंद्रियादिकांचे साक्षिरूप जे प्रज्ञान, जें ' त्वं ' या शब्दावरून अर्थरूपाने घ्यावयाचे, तेच " हा ब्रह्म " इ. वाक्याने, जगाला कारणीभूत असे परब्रह्म होय; या दोघात किंचित्सुद्धा भेद नाही, याप्रमाणे ऐतरेय उपनिषदातील महावाक्याच्या ज्ञानाची सिद्धी मला निरंतर व पूर्णपणे व्हावी, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४० यतः सर्वत्र–अवस्थितं परं ब्रह्म, अतः मयि अवस्थितं प्रज्ञानं ब्रह्मैव आत्मज्ञानत्व–अविशेषात् इति ऐतरेय-महावाक्योक्त–जीवब्रह्मैक्य-ज्ञानसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४० ज्या अर्थी परब्रह्म हे सर्वत्र व्यापून आहे, त्या अर्थी माझ्या ठिकाणी असणारी ज्ञानकलाही ब्रह्मच होय. आत्मज्ञानाहून थोडाही वेगळेपणा तिच्या ठिकाणी नाही; याप्रमाणे ऐतरेयातील महावाक्यात सांगितलेले जीवब्रह्मांच्या ऐक्याचे ज्ञान मला पूर्णपणे प्राप्त होवो, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४१ आत्मसंनिधौ विद्यमानत्वेन जडरूपस्य अपि देहेंद्रियादेः भासमानत्वात् आत्मा चिद्रूपः इति चिदात्मानुभव-सिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४१ देहेंद्रियादि जड पदार्थ आत्म्याच्या संनिधानी असतात म्हणूनच भासमान होतात. ह्यावरून आत्मा चैतन्य स्वरूप-ज्ञानरूप आहे हे सिद्ध आहे. तर असा चैतन्य-

आत्म्याचा अनुभव मला निरंतर व पूर्ण असावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४२ स्वात्मसहितत्वेन दुःखात्मकस्य देहादेः अपि प्रियतमत्वात् आत्मा परमानंदरूपः इति आनंदानुभवसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४२ देहादिक पदार्थ दुःखदायक असताही आत्मसंगतीनें ते प्रियकर होतात, त्या अर्थी आत्मा परमानंदरूप आहे असे सिद्ध होते. तर ही आनंदानुभवसिद्धी मला पूर्णपणे व्हावी, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४३ देशतः कालतः वस्तुतः परिच्छेदरहित-अद्वितीय-ब्रह्मानुभवसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४३ ज्याला देशाची, कालाची व पदार्थांची मर्यादा नाही, अशा अद्वितीय परब्रह्माचा अनुभव मला सिद्ध व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४४ पूर्वापर - परामर्शमन्तरेण सहसा उत्पद्यमानस्य क्रोधादि वृत्तिविशेषस्य हेतोः चित्तगत-संस्कारस्य विवेकजन्यायां क्षांतिवासनायां दृढायां सत्यां बाह्यनिमित्तेन क्रोधादि-अनुत्पत्तिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्त अनुगृह्णन्तु !**

४४ मागचा पुढचा विचार न राहता एकाएकी उद्भूत होणाऱ्या क्रोधादि विकारांचे मूळ जे चित्तगत संस्कार, तें क्षीण होऊन विवेकजनित क्षमेची वृत्ती दृढ व्हावी व त्या-

मुळे बाह्य निमित्त झाले असताही क्रोधादि वृत्ती उद्भवू नयेत, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

४५ **" यस्य प्रसादात् अहमेव विष्णुः, मय्येव सर्वं परिकल्पितं च " इति इत्थं आत्मरूपं विजानामि, तस्य पादारविंदयोः अचंचला भक्तिः निरंतरं सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४५ ज्याच्या कृपाप्रसादाने " मीच विष्णू आहे; माझ्याच ठिकाणी हे सर्व परिकल्पित आहे " अशा प्रकारे आपल्या स्वरूपाचे ज्ञान होते, त्या श्रीविष्णूच्या पदारविंदांच्या ठिकाणी माझी स्थिर व निरंतर भक्ती जडावी, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

४६ **अचिद्रूपस्य जगतः चित्संनिधेः विद्यमानत्वात् चिद्रूपात्मा सर्वगतः इति सर्वगतात्मानुभवसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४६ जड असे जे जगत् त्याला चैतन्यसांनिध्यानेच अस्तित्व असल्यामुळे, चिद्रूप आत्माच सर्वगत आहे हे सिद्ध होते. तर अशा सर्वगत आत्म्याचा अनुभव मला पूर्णपणे व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

४७ **सर्व-अर्थसाधकत्व-हेतुना सर्वसंबंधेन च आत्मा परिपूर्णः इति परिपूर्णात्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४७ हरएक गोष्टीची सिद्धी होण्यास मूळ हा आत्माच आहे व हरएक गोष्टीत त्याचा संबंध आहे. त्या अर्थी

आत्मा परिपूर्ण आहे असे होते. तर असा परिपूर्ण आत्मानुभव मला पूर्णपणे सिद्ध व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४८ देश–काल–अव्यवहितत्वेन पारोक्ष्यहेतोः अभावात् साधनांतरनिरपेक्षतया स्वयंप्रकाशमानः चिदात्मा सर्वदा स्वतःसिद्धः अपरोक्षरूपः इति अपरोक्षात्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४८ सर्व देशी व सर्व काळी आत्मा अनुस्यूत असल्यामुळे तो अप्रत्यक्ष केव्हाच नाही. म्हणून तो अन्य एखाद्या साधनाच्या मदतीवाचून स्वतःच प्रकाशमान होणारा, स्वतःसिद्ध व साक्षात् प्रतीत आहे हे सिद्ध आहे. तर असा अपरोक्ष–आत्मसाक्षात्कार पूर्णपणे मला व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**४९ यत्र यद्वस्तु ईक्ष्यते तेन वस्तुना अन्यत्र अनन्वागतत्वेन आत्मा असंगः इति असंगात्मानुभवसिद्धिः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

४९ एखाद्या ठिकाणी जो एखादा पदार्थ पाहण्यात येतो, त्या पदार्थाबरोबर पाहणारा-आत्मा तेथून दुसरे स्थळी जातो असे होत नाही. (म्हणजे तो तद्रूप होऊन न राहता आणखी पुष्कळ अन्य पदार्थांना पाहतो.) त्यावरून आत्मा असंग आहे असे होते. तर ही असंग आत्मानुभवाची सिद्धी मला पूर्णपणे व्हावी, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**५० निरवयवत्वेन असंगत्वेन च आत्मनः केनापि संबंधाभावात् आत्मा नित्यमुक्तः इति नित्यमुक्तस्वरूपानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

५० आत्मा अवयवरहित आहे आणि संगरहित आहे, त्यामुळे त्याचा कोणाशीही संबंध असू शकत नाही. तर अशा आत्म्याच्या नित्यमुक्त स्वरूपाचा अनुभव मला पूर्णपणे व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**५१ अवेद्यत्वे सति अपरोक्ष–व्यवहार–योग्यत्वात् आत्मः स्वयंप्रकाशः इति स्वयंप्रकाश आत्मानुभवः सम्यक् भूयात्। इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

५१ आत्मा हा ज्ञेय नाही खरा; पण साक्षात् व्यवहारक्षम असल्यामुळे तो स्वयंप्रकाश आहे असे होते. तर अशा स्वयंप्रकाश आत्म्याचा मला स्पष्ट साक्षात्कार व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !

**५२ साधनान्तर-निरपेक्षतया स्वयमेव भासमानत्वात् आत्मा स्वयंप्रकाशः इति स्वयंप्रकाश–आत्मानुभवः सम्यक् भूयात्, इति भवन्तः महान्तः अनुगृह्णन्तु !**

५२ अन्य साधनांच्या अपेक्षेवाचून आत्मा केवळ स्वयमेव प्रकाशमान होत असल्यामुळे तो स्वयंप्रकाश आहे, असे सिद्ध होते. तर अशा स्वयंप्रकाश आत्म्याचा मला स्पष्ट साक्षात्कार व्हावा, असा महाराज ! मजवर आपण अनुग्रह करा !